# महाराष्ट्र शासन
## सहाय्यक संचालक ( पुरातत्व )
## विभागीय कार्यालय, नांदेड विभाग

व्दारा - डॉ.दिपक म्हैसेकर, दर्शन, दुसरा मजला, कैलासनगर, नांदेड - ४३१ ६०५.

दुरध्वनी क्रमांक : ०२४६२ - २५००४०
Email Id : ada.nanded@gmail.com


---

जा.क्र. स्मारके / जतन / २०२६ / ९३ दिनांक : ०६ MAR २०२६

प्रति,
मा.सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नविन प्रशासकीय इमारत, 17 वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई - 400 032.

**विषय** : राज्य स्तरावरील सर्वाधिक खपाच्या दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने यासोबत पाठविण्यात येत असलेली जाहिरात राज्य स्तरावरील सर्वाधिक खपाच्या दोन दैनिक वृत्तपत्रात विहीत मुदतीत प्रसिध्द करण्यात यावी सोबत जाहिरातीचा मसुदा जोडलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | कार्यालयाचे नांव | : सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नांदेड |
| 2) | जाहिरातीचे स्वरुप | : राज्य स्तरीय |
| 3) | जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक | : दिनांक 07.03.2026 रोजी किंवा तत्पूर्वी |
| 4) | प्रसिध्दीची पातळी व वर्तमान पत्र | : राज्य स्तरावरील सर्वाधिक खपाचे दोन वृत्तपत्र |
| 5) | जाहिरातीचे देयक पाठविण्याचा पत्ता | : सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, व्दारा-डॉ.दिपक म्हैसेकर, दर्शन, दुसरा मजला, कैलासनगर, नांदेड - 431 605. |

सोबत : जाहिरातीचा मसुदा.

आपला विश्वासू

( अमोल ना. गोटे )
सहाय्यक संचालक (पुरातत्व),
नांदेड विभाग

प्रत :

1) मा.संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) मा.वरिष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, नांदेड यांना माहितीस्तव.

3) वरिष्ठ लेखा लिपिक, लेखा शाखा, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नांदेड यांना माहितीस्तव.

## **स्वारस्य प्रकटन** (2025-26) **क्रमांक** - 01

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नांदेड यांच्या अधिपत्याखालील स्मारकांचे संवर्धन व विकास आराखडे (Site Management Plan) नामिकासूचीमध्ये नसलेल्या नवीन वास्तुविशारदांकडून (Fresh Pass out) तयार करुन घेण्याकरीता खालील निकषांच्या अधिन राहून वास्तुविशारदांकडून निकषाची निश्चिती करणेबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे. या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, नांदेड या कार्यालयास सदर प्रस्ताव सादर करण्यात यावे.

**अटी व शर्ती** :-

1. वास्तुविशारदांनी Conservation Architecture या विषयामध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेली असावी ( उर्तीर्ण होऊन 05 वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला नसावा, तसेच त्यांनी Council of Architecture या संस्थेचे प्रमाणपत्र स्पर्धेमध्ये जिंकून आल्यानंतर सादर करणे बंधनकारक असेल.
2. सदर स्पर्धा सहाय्यक संचालक(पुरातत्व), विभागीय कार्यालय, नांदेड यांनी नामित केलेल्या तुलनेने कमी महत्त्वाच्या राज्य संरक्षित स्मारकांसाठी लागू असेल.
3. संचालनालयाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात हा आराखडा बनविणे बंधनकारक असेल.
4. दस्तऐवजीकरणासाठी पारंपारिक तंत्राबरोबर आधुनिक तंत्रज्ञान (Photogrammetry, Drone Survey. GIS Mapping इत्यादी) आवश्यकतेनुसार वापरणे आवश्यक आहे.
5. जतन-संवर्धनाच्या सद्यस्थितीमध्ये त्याचे Conditional Documentation, छायाचित्रे, आराखडे या स्वरुपात असणे अपेक्षित आहे.
6. आपत्ती व्यवस्थापन हा स्थानिक परिस्थितीचा विचार करुन त्या-त्या स्मारकाशी निगडीत आवश्यक बाबीचा समावेश करुन तयार करण्यात आलेला असावा.
7. जतन संवर्धन कामाचे ढोबळ/सविस्तर अंदाजपत्रक त्या-त्या वर्षातील प्रचलित राज्य दरसूचीनुसार (S.S.R) आणि दरसूची बाह्यबाबीचे दर (Non S.S.R Item) बाबीचे दर बाजारभावानुसार अभ्यास करुन दर पृथ्यःकरण करुन तयार करण्यात यावे.
8. तयार केलेले स्थळ व्यवस्थापन आराखडे तपासणीकरिता परिक्षण मंडळाची स्थापना करण्यात येईल आणि परिक्षण मंडळाचा निवडीबाबतचा निर्णय अंतिम असेल.
9. वास्तुविशारदांना एकापेक्षा अधिक स्मारकांच्या स्पर्धेत भाग घेता येईल.
10. सदर आराखडा दिनांक 31.07.2026 पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.
11. स्मारकांची यादी या विभागाच्या संकेतस्थळ(https://www.mahaarchaeology.in) तथा या कार्यालयास ई-मेल-ada.nanded@gmail.com व श्री.दिगंबर ग. कोटकर, जतन आवेक्षक, नांदेड विभाग (मो.नं.9325699851) यांच्याशी संपर्क केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.
12. प्रस्ताव A-4 साईजच्या Protrate आकारात PDF स्वरुपात असावा, शब्दांचा फॉन्ट New Times Roman Font Size 12 असावी.
13. प्रस्तावातील नकाशे (Drwaings) A-3 Sheet वर असावेत.
14. प्रस्तावास दोन्ही बाजूने Hard Bound Cover असावे.
15. प्रस्तावातील सर्व माहितीचे स्वामीत्व महाराष्ट्र शासनाचे राहील.
16. या स्पर्धेत जे वास्तुविशारद यशस्वी होतील. त्यांचे नाव नामिकासूचीत समाविष्ट होण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येईल. तसेच त्या स्मारकाचा संवर्धन आराखडा तयार करण्याची व्यावसायीक संधी देण्यात येईल.

इच्छुक वास्तुविशारदांनी आपला इच्छुकता अर्ज या कार्यालयास दिनांक 20.03.2026 पर्यंत सादर करावा. तसेच दिनांक 01.04.2026 पर्यंत पात्र वास्तुविशारद यांची यादी जाहीर करण्यात येईल.

**दुरध्वनी क्रमांक** : 02462-250040
**ई-मेल** : ada.nanded@gmail.com
**कार्यालयाचा पत्ता** : डॉ.दिपक म्हैसेकर, दर्शन, दुसरा मजला, कैलासनगर, नांदेड - 431 605.

-स्वाक्षरित-
( अमोल ना. गोटे )
सहाय्यक संचालक (पुरातत्व),
नांदेड विभाग